# स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

' मानव्य ' विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच. डी.
(विद्या वाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

**संशोधन विषय**

## "अरूण काळे यांच्या कवितेतील समग्र जाणिवांचा चिकित्सक अभ्यास"

**संशोधक**

**अतुल बालाजीराव समिंद्रे**

(परभणी)

**मार्गदर्शक**

**प्रा.डॉ.दत्ता रूस्तुमराव शिंदे**

संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय, परभणी

**जून**, 2019

# "अरूण काळे यांच्या कवितेतील समग्र जाणीवांचा चिकित्सक अभ्यास"

**प्रास्ताविक** :

एकूण मराठी दलित साहित्याचा विचार करता दलित आत्मकथा (आत्मचरित्रे) व दलित कविता यांचा प्रभाव मराठी साहित्य तसेच भारतीय साहित्य सृष्टीवर झालेला दिसतो.

प्रामुख्याने मराठी दलित कवितेचाच विचार करायचा झाल्यास आपल्याला संत चोखोमेळा, संत कर्ममेळा यांच्या अभंगापासून संदर्भ घेता येतो. पुढे जाऊन आधुनिक मराठी साहित्याततही ते आढळतात. उदाहरणा दाखल केशवसुत यांची 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न ' म्हणून घेता येईल.

बुध्द, कबीर, शाहू, फुले यांचा प्रभाव असलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर ही प्रामुख्याने दलित साहित्यची प्रेरणा आहे. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा त्यांनी दिलेला मूलमंत्र दलितांनी अंगिकारला व मिळालेल्या शिक्षण व समज यांचा वापर करून आपल्या जिवणाचे लाचार व दयणिय चित्र लिखाणाच्या माध्यमातून जगा समोर आणले. फक्त लाचारी मर्यादित न ठेवता त्यांनी त्यांच्या कवितेच्या माध्यमातून दलित वर्गाची विदारक स्थिती त्यातून निर्माण झालेली चिड, विद्रोह, नकार, संघर्ष व्यक्त केला आणि मराठी साहित्यात प्रथमच एवढया प्रकर्षाने दलित कवितेच्या निमित्ताने दलित साहित्याला एक ओळख व हक्काची जागा मिळाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समकालीन व त्या नंतरच्या कालखंडात किसन फागूजी बंदसोडे, गोपाळ बाबा वलंगकर, शिवराम कांबळे ,दिनबंधू, वामन कर्डक, बंधू माधव, आण्णाभाऊ साठे या सर्वांनी आपल्या साहित्यातून नवीन जाणिवांना जागा दिली व दलित साहित्याला बळकटी मिळवून देण्यात मोलाची कामगिरी केली.

१९६० नंतरच्या दलित कवितेचा कालखंड हा प्रामुख्याने नोंद घेण्यासारखा आहे. मराठी साहित्याचा कुठलाही पुर्वग्रह न ठेवता या कालखंडातील दलित कवितेतून दलित जाणीवा प्रभावीपणे व्यक्त झालेल्या आहेत. एक प्रकारे दलित आणि दलित कविता एकमेकांना बरोबरीने घेऊन चालणारी ठरली.

नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, दया पवार, यशवंत मनोहर, केशव मेश्राम, ज.वि.पवार, वामन निंबाळकर, अर्जून डांगळे, ज्योती लांजेवार, शरणकुमार लिंबाळे व अरूण कांबळे या सर्व कवींनी दलित कवितेला प्रस्थापित कवितेपासून वेगळे व विशेषपणा प्राप्त करून दिला.

2.....

तसेच दलित कवितेची वाटचाल दृढ केली. सर्वस्वी आंबेडकरी प्रेरणा व दलित आत्मशोध या जाणीवा या कालखंडात वारंवार दिसून येतात.

१९८० दरम्यानचे व त्या नंतरच्या कालखंडातील दलित कवितेमधून दलित चळवळींचा प्रभाव, परिणाम दिसून येतो. दलित समाजाच्या नवीन गरजा व त्या अनुषंगाने नवीन जाणीवा दलित कवींनी आपल्या कवितेतून विषद केल्या. आंबेडकरी प्रेरणेचा जोम तसाच राखून जागतिकीकरणाचा परिणाम, सामाजिक व आर्थिक बदल, विषमतेचे चित्र, माणूसपणाची जाणीव अशा वेगवेगळया परिवर्तनाचे दाखले दलित कवींनी दिले. भूजंग मेश्राम, वाहरू सोनवने , राम दोतोंडे, महेंद्र भवरे, लोकनाथ यशवंत, बबन लोंढे, भाऊ पंचाभाई, मधू गवई, माधव सरकुंडे व अरूण काळे ही काही महत्वाची नावे या कालखंडातील प्रभावी दलित कवींची घेता येतील.

अरूण काळे यांचे दलित कवितेमधील स्थान हे त्यांच्या कवितेतील नवेपण व वेगळेपण याद्वारे प्रभावीपणे निदर्शनास येते. नव्वदीमधील समकालीन दलित व एकूण मराठी कवितेमध्ये अरूण काळे यांचे लिखाण मोलाचे आहे. दलित प्रेरणा व दलित कवी म्हणून ओळख असली तरीपण साचेबंद दलित कवितेतील विद्रोह, उपहास, नकार, असंतोष, विषमता याच्या बरोबरच त्यांनी आपल्या कवितेतून मानवी मूल्ये, जागतिकीकरण, वैश्विक्ता, माहिती तंत्रज्ञान, शहरी जीवण व इतर काही काव्याश्य व्यक्त केलेले आहेत.

अरूण काळे यांच्या दलित कवितेत चिंतनशिलता दिसून येते. दलित कार्यकर्ता त्याचे जीवण त्याच्या मानसिक, सामाजिक, व्यवहारीक, जाणीवा तसेच जागतिकीकरणाचा झालेला व्यवस्थेवरील परिणाम यांसारख्या जाणीवा त्यांच्या काव्यशयाचा भाग आहेत. समकालीन सामाजिक भान, राजकारण त्याचा सामान्य माणसांवरील परिणाम व जिवणशैलीत येणारे परिवर्तन, त्या परिवर्तनाची गरज यांचाही आढावा त्यांच्या कवितेतून घेता येतो.

एकूणच अरूण काळे यांच्या काव्यविश्वात आधुनिक व सामाजिक परिवर्तनशील जाणिवांचा काव्याशय मोठया प्रमाणावर दिसून येतो. काही ठिकाणी त्यांची कविता ही फक्त दलित कविता न उरता समस्त मानव जातीच्या समकालाशी मेळ खाते असे जाणवते. दलित समाज व एकूण समकालीन परिस्थिती यांचे आलेले काव्याशय हे दलित कवितेच्या आकृतीबंध साच्यापेक्षा स्वत:चे वैशिष्टये व वेगळेपण प्रस्थापित करणारी अशा स्वरूपाची अरूण काळे यांची कविता आहे. त्यांच्या कवितेतून आढळणाऱ्या जाणिवा या सामाजिक भान करून देण्यासाठी महत्वपूर्ण ठरणाऱ्या अशा स्वरूपातील आहेत. परिवर्तन, समकाल, नवीन

जाणिवांची दलित साहित्यातील पार्श्वभूमी, गरज व परिणाम यांचा शोध घेणे आगत्याचे ठरते. या हेतू मधूनच प्रस्तुत विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

**संशोधनाची गरज** :

दलित कवितेचा अभ्यास करून अरूण काळे यांच्या कवितेतील जाणिवांचा शोध घेणे तसेच कशाप्रकारे त्या जाणिवा दलित कवीतेतील नवे प्रवाह, बदलते स्वरूप, आंबेडकरी प्रेरणे बरोबरच, जागतिकीकरण, मानवी मूल्ये, वैश्विकता, माहिती तंत्रज्ञान यांचा अंगीकार व त्या अनुषंगाने समकालीन दलित तसेच सामान्य समाजवास्तव यांचे परिवर्तनीय अंग त्यांचा अभ्यास करणे ही संशोधनाची गरज आहे.

**संशोधनाची व्याप्ती** :

अरूण काळे यांच्या 'रॉक गार्डन', 'सायरनचे शहर', 'नंतर आलेले लोक' व 'ग्लोबलचे गावकुस' या चार कविता संग्रहांना आधारभूत माणून त्यांच्या कवितेतील समग्र जाणिवांचा अभ्यास करणे ही या संशोधनाची व्याप्ती आहे.

**अभ्यास मर्यादा** :

अरूण काळे यांच्या कविता (रॉक गार्डन, सायरनचे शहर, नंतर आलेले लोक व ग्लोबलचे गावकुस कविता संग्रह) यांचा समग्र अभ्यास या संशोधनात अंतर्भूत आहे. व या कविता संग्रहांचाच संशोधनासाठी लिखित सामग्री म्हणून वापर करण्यात येईल. अरूण काळे यांच्या कवितेतील समग्र जाणिवांचा अभ्यास या व्यतिरीक्त दुसऱ्या कोणत्याही विषयाचा अभ्यास अपेक्षित नाही.

**गृहितके** :

1. दलित पार्श्वभूमी व प्रेरणा असूनही अरूण काळे यांची कविता एकूण दलित कवितेत स्वत:चे वगळेपण प्रस्थापित करणारी आहे.
2. अरूण काळे यांच्या कवितेत दलित विद्रोहा बरोबरच समकालीन आधुनिक व दलित कवितेला परीवर्तनीय ठरणाऱ्या जाणिवा आढळतात.
3. दलित चळवळीतील कार्यकर्ता सामान्य दलित यांच्या जीवणशैलीतील बदल व बदललेल्या गरजा अरूण काळे यांच्या कवितेत वर्णन केलेल्या आहेत.
4. जागतिकीकरण सामाजिक, आर्थिक, व्यवहारीक बदलासाठी कारणीभूत ठरले. व त्याचे परिणाम दलित व सामान्य जण भोगत आहेत. असे अरूण काळे यांनी नमूद केलेले आहे.
5. आजमीतिला मानवी मूल्ये, वैश्विकतेची असलेली गरज व त्यांची मांडणी हे अरूण काळेंचे काव्यविश्व आहे.
6. माहिती तंत्रज्ञानाचे मानवी जिवनात वाढत असलेले महत्व व स्थान वारंवार कवितेतून अरूण काळे दाखवून देतात.
7. अरूण काळे यांनी व्यक्तीचित्रे व प्रतिमा त्यांच्या कवितेतून प्रामाणिक व चिंतनशिलतेने वापरलेल्या आहेत.
8. फक्त दलित कवी म्हणून अरूण काळे यांना एका अकृतीबंध साच्यामधून पाहणे सर्वस्वी योग्य ठरत नाही. तर त्याच्या पलीकडे जाऊन अखील मानवीय पातळीवरील जाणिवा व्यक्त करणारा कवी आहे.
9. इंग्रजी शब्दांचा भडीमार, विशिष्ट व काही ठिकाणी अनाकलनीय शब्द योजना अरूण काळे यांच्या कवितेत आहे.
10. अरूण काळे यांची एकूण पार्श्वभूमी व चिंतनशील वृत्ती ही त्यांच्या कवितेतून अविष्कृत झालेल्या जाणिवांचा चिकित्सक पध्दतीने अभ्यास करण्यास भाग पाडते.

**संशोधनाचे महत्व** :

अरूण काळे यांनी आपल्या कवितेतून दलित समाजाचे व दलित कवितेचे नवीन आशय समोर मांडले. त्यामुळे या संशोधनात आधुनिक दलित समाज व समाजावास्तव जाणून घेणे शक्य आहे.

त्यांच्या कवितेतून आंबेडकरी अस्मितेबरोबरच जागतिकीकरणाचे समाजावरील विविधांगी परिणाम, मानवी मूल्यांचा ऱ्हास व गरज, दलित कार्यकर्त्यांची वैचारीक परिवर्तन व पातळी, तसेच आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचे सामान्य जिवणातील स्थान यांचा शोध या संशोधनाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. काही ठिकाणी अरूण काळे यांची कविता ही फक्त दलितांसाठी म्हणून न उरता समस्त मानव जातीला सर्वसमावेशक जीवण उददेश देणारी आहे.

एकूण समकालीन सामाजिक परिस्थितीचे भान व परिवर्तनशील वाटचाल यांचा अभ्यास व फक्त दलित म्हणूनच नाहीतर एक सामान्य समाजाचा अभ्यास बहूअयामी दृष्टीने करता येणे शक्य आहे.

**संशोधनाची साधने** :

1. अरूण काळे यांच्या 'रॉक गार्डन', 'सायरनचे शहर', 'नंतर आलेले लोक' व 'ग्लोबलचे गावकुस' या कविता संग्रहांचा वापर प्रमुख संशोधन साधन म्हणून करण्यात येईल.
2. अरूण काळे यांच्याशी संबंधीत काही महत्वपूर्ण व्यक्ती तसेच त्यांचे अभ्यासक यांच्याशी चर्चा करून मिळविलेल्या माहितीचे संकलन योग्य प्रकारे प्रबंधात मांडणी करण्यात येईल.
3. संदर्भ ग्रंथ व इतर ग्रंथ तसेच अंक, प्रसिध्दलेख, नियतकालिके, इंटरनेवरील साहित्याचा वापरही संशोधनात अपेक्षित आहे.

**संशोधन पध्दती** :

प्रस्तुत विषयाला अनुसरून अरूण काळे यांच्या कवितेतील समग्र जाणिवांचा अभ्यास करतांना प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर, तसेच अरूण काळे संबंधित काही व्यक्ती व अभ्यासक यांच्या मुलाखती या सर्वांचे विवेचणात्मक, विवरणात्मक व काही अंशी तौलनिक संशोधन पध्दतींचा वापर अपेक्षित आहे.

**संशोधनामागील उददेश** :

1. मराठी दलित कवितेतील अरूण काळे यांच्या कवितेची स्थान निश्चिती करणे.
2. अरूण काळे समकालीन दलित कवितेची व कविंची एकूण वाटचाल यांचा अभ्यास करणे.
3. अरूण काळे व्यक्ती पार्श्वभूमि व कवितेची प्रेरणा समजून घेणे.
4. अरूण काळे यांच्या कवितेतून व्यक्त झालेल्या दलित आंबेडकरी जाणिवा, जागतिकीकरणाला अनुसरून सामाजिक भाण व वास्तव दर्शविणाऱ्या जाणीवा, मानवी मूल्ये, माहिती तंत्रज्ञानाचे स्थान, व्यक्तीचित्रण व प्रतिमांप्रती असलेल्या जाणिवा शोधणे.
5. अरूण काळे यांची कविता दलित कवितेपासून स्वत:चे एक वेगळेपण कशाप्रकारे विषद करते हे अभ्यासणे.
6. भाषाशैली, शब्द योजना, स्वरूप, वैशिष्टये या अंगांचा अरूण काळे यांच्या कवितेच्या अनुषंगाने अभ्यास करणे.
7. अरूण काळे समकालीन मराठी कवितेतील लेखणप्रवाह माहिती करून घेणे.

**संभाव्य निष्कर्ष** :

मराठी दलित कवितेची वाटचाल, जडणघडण, वैशिष्टये माहिती करून घेता येतात. अरूण काळे यांच्या कवितेमागच्या पार्श्वभूमि व प्रेरणा शोधता येतील. त्यांच्या कवितेतून व्यक्त झालेल्या समग्र जाणीवा अभ्यासता येतील. व त्या जाणीवांच्या आधारे मुलभूत समाज वास्तव, भान, परिवर्तनीय अंग जाणून घेता येतील. अरूण काळे समकालीन लेखन प्रवाह तसेच अरूण काळे यांच्या कवितेशी वेगळेपण मांडता येईल.

## प्रकरणांचा आराखडा :

प्रस्तुत प्रबंधातील प्रकरणांचा आराखडा पुढीलप्रमाणे आहे.

**प्रकरण** 1 मराठी दलित साहित्याचा आढावा

**प्रकरण** 2 दलित कवितेची वाटचाल

**प्रकरण** 3 अरूण काळे व्यक्ती आणि काव्यजगत

**प्रकरण** 4 जागतिकीकरण, शहर, माहिती तंत्रज्ञान संदर्भातून अरूण काळे यांच्या कवितेतील आविष्कृत जाणिवा.

**प्रकरण** 5 मानवी मूल्ये व वैश्विकता या जाणिवांचे कवितेतील स्थान

**प्रकरण** 6 आंबेडकरी अस्मिता व व्यक्तीचित्रात्मक काव्यजाणिवा

**प्रकरण** 7 अरूण काळे यांची लेखणशैली व त्यांचे वेगळेपण

**प्रकरण** 8 निष्कर्ष व उपसंहार

# प्रकरण रचना

## प्रकरण 1 मराठी दलित साहित्याचा आढावा

दलित साहित्याची व्याख्या, दलित साहित्याचा इतिहास, स्वरूप, दलित साहित्याच्या प्रेरणा, दलित साहित्य व दलित चळवळींचा संबंध, निवडक दलित साहित्य व साहित्यीक, दलित साहित्याचे मराठी साहित्यातील वेगळेपण व स्थान, दलित साहित्यातील निवडक आशय.

## प्रकरण 2 दलित कवितेची वाटचाल

दलित कवितेची संकल्पना व स्वरूप, दलित कवितेची पार्श्वभूमि, दलित कवितेच्या प्रेरणा, दलित कवितेचा काव्याशय, दलित साहित्यातील दलित कवितेचे विशेषस्थान व वेगळेपण, दलित कवितेची जडणघडण व वाटचाल, बदलत जाणारी दलित कविता, दलित कवितेचे महत्वपूर्ण कालखंड निवडक दलित व कवी अरूण काळे समकालिन दलित व इतर काही कवी व कवितांचे स्वरूप व वैशिष्टये यांचा अभ्यास अभिप्रेत आहे.

## प्रकरण 3 अरूण काळे व्यक्ती आणि काव्यजगत

अरूण काळे यांची पार्श्वभूमि, जिवणप्रवास, अरूण काळे यांच्या आयुष्यातील प्रेरणा व प्रभाव टाकणाऱ्या व्यक्ती, साहित्य, विचार प्रवाह अरुण काळे यांचे अनुभवविश्व, लेखण प्रेरणा, काव्याशय, लेखनप्रवास थोडक्यात रॉक गार्डन, सायरनचे शहर, नंतर आलेले लोक व ग्लोबलचे गावकुस या संग्रहांद्वारे. अरूण काळे यांच्या कवितेतून आढळणाऱ्या काव्य जाणिवांचे वर्गीकरण.

**प्रकरण 4 जागतिकीकरण, शहर, माहिती तंत्रज्ञान संदर्भातून अरूण काळे यांच्या कवितेतील आविष्कृत जाणिवा.**

जागतिकीकरण संकल्पनेविषयी थोडक्यात, जागतिकीकरण आणि समाज संबंध, सामाजिक विविधअंगी बदलांचा येथे अरूण काळे यांच्या कवितेच्या अनुशंगाने अभ्यास करता येईल.

शहरीकरणाचा वाढता वेग, सामान्यांवर होत असलेले परिणाम, शहरातील विषमता, शहरीकरणाचा एकूण समकालीन व प्रादेशिक अभ्यास येथे अभिप्रेत आहे.

माहिती तंत्रज्ञान युग, क्रांती, परिणाम, स्वरूप, जीवण राहणीमानात आलेले परिवर्तन, मानवी जिवनातील स्थान माहिती करून घेण्यात येईल.

एकूण जागतिकीकरण, शहरीकरण व माहिती तंत्रज्ञातून अविष्कृत झालेल्या अरूण काळे यांच्या कवितेतील जाणीवांचे स्वरूप, प्रेरणा, प्रयोजन, महत्व, वेगळेपण या प्रकरणात सर्वांगाने अभ्यासता येईल.

**प्रकरण 5 मानवी मूल्ये व वैश्विकता या जाणीवांचे कवितेतील स्थान**

मानवी मूल्ये व वैश्विकतेची संकल्पना, त्यांचे महत्व. मानवी मूल्यांचा होणारा ऱ्हास, वैश्विकता व मानवी मूल्यांची गरज, बदलत जाणारे मानवी मूल्ये. दलित भावनेविषयी संबंध दर्शविणारी मानवी मूल्ये व वैश्विकता यांचा अभ्यास करण्यात येईल.

अरूण काळे यांच्या कवितेतून आलेल्या मानवी मूल्यांचे वर्गीकरण व त्यांचे नेमके स्थान, महत्व , प्रयोजन निश्चित करण्याच्या अनुषंगाने या प्रकरणात अभ्यास होईल.

वैश्विकतेची गरज व कवितेतून दिलेले दाखले यांचाही शोध घेता येईल.

**प्रकरण 6 आंबेडकरी अस्मिता व व्यक्तीचित्रात्मक काव्य जाणीवा**

आंबेडकरी प्रेरणा, अस्मिता, स्वरूप, विचारसरणी, प्रभाव, जडणघडण, साहित्यामागची असलेली आंबेडकरी अस्मितेची पार्श्वभूमी, बदलत जाणाऱ्या भावना, दलित चळवळी, दलित कार्यकर्ता, समकालीन दलित आंबेडकरी अस्मिता. अरूण काळे यांनी आपल्या कवितेतून वर्णन केलेल्या आंबेडकरी भावना व त्यांना दिलेले स्थान त्यातून व्यक्त झालेल्या जाणिवांचा अभ्यास करता येईल.

तसेच अरूण काळे यांच्या कवितेतून आलेले व्यक्तीचित्रण त्यामागची चिंतनशीलता, भावना त्यांच्याशी असलेला संबंध व व्यक्त होणाऱ्या जाणीवांचा शोध या प्रकरणातून घेता येईल.

**प्रकरण 7 अरूण काळे यांची लेखणशैली व त्यांचे वेगळेपण**

अरूण काळे यांच्या कवितेचे एकूण स्वरूप, प्रयोजन, काव्याशय, प्रतिमा व वेगळेपण. भाषिक शैली शब्दयोजना समकालीन कवितेशी तुलना स्वत:चे दलित कवितेतील वेगळेपण प्रस्तापित करणाऱ्या मुदयांची चिकित्सा, अरूण काळे यांची बदलत जाणारी कविता यांचा अभ्यास याठिकाणी अभिप्रेत आहे..

**प्रकरण 8 निष्कर्ष व उपसंहार**

सात प्रकरणांच्या रचनेतून 'अरूण काळे यांच्या कवितेतील समग्र जाणिवांचा चिकित्सक अभ्यास करण्यात येईल. अनुक्रमे प्रकरण 1 मध्ये दलित साहित्याचा एकूण आढावा घेतला आहे. प्रकरण 2 मध्ये दलित कवितेचे विश्लेषण केलेले आहे. प्रकरण 3 मध्ये अरूण काळे यांचे व्यक्तिमत्व व काव्यसृष्टी मागील पार्श्वभूमि व प्रेरणा जाणून घेतली आहे. प्रकरण 4 मध्ये जागतिकीकरण, शहर वास्तव, माहिती तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने व्यक्त जाणिवा अभ्यासलेल्या आहेत. प्रकरण 5 मध्ये वैश्विकता, मानवी मूल्यांचे स्थान व व्यक्त केलेल्या जाणिवांचा अभ्यास केला आहे. प्रकरण 6 मध्ये आंबेडकरी अस्मितेविषयी व कवितेत आलेल्या व्यक्तीचित्रांविषयी जाणिवांचा शोध घेतला आहे. प्रकरण 7 मध्ये अरूण काळे यांच्या कवितेचे सर्वांगीण मूल्यमापण करण्यात आलेले आहे. प्रकरण 8 मध्ये सर्व प्रकरणांचा अभ्यास करून निष्कर्ष व उपसंहार केलेला आहे.

**संदर्भसुची** :

1.काळे अरूण - ' रॉक गार्डन', (कवितासंग्रह) प्रबोधन प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, 2011

2.काळे अरूण - ' सायरनचे शहर' ,(कवितासंग्रह) सत्यजीत प्रकाशन, नाशिक, पहिली आवृत्ती, 1997

3.काळे अरूण - ' नंतर आलेले लोक', (कवितासंग्रह) लोकवाङ्मय गृह, मुंबई, सहावी आवृत्ती, 2015

4.काळे अरूण - ' ग्लोबलचं गावकुस',(कवितासंग्रह) लोकवाङ्मय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, 2008

5.फडके भालचंद्र - ' दलित साहित्य: वेदना व विद्रोह', स्त्री विद्या प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, 2017

6.लिंबाळे शरणकुमार- ' दलित साहित्य आणि सौंदर्य', दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.,पुणे, प्रथम आवृत्ती, 2018

7.पारसे बिरा - ' दलित कवितेतील अस्मिता', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, 2008

8.वाघमारे जनार्दन - ' दलित साहित्याची वैचारीक पार्श्वभूमी', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, 2014

9.किरवले कृष्णा - ' दलित चळवळ आणि साहित्य', प्रतिमा प्रकाशन, पुणे, सुधारीत आवृत्ती, 2006

**संशोधक**

**अतुल बालाजीराव समिंद्रे**
(परभणी)

**मार्गदर्शक**

**प्रा.डॉ.दत्ता रूस्तुमराव शिंदे**
संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय,
परभणी